ठाणेदारच्या कार्याचे ढाकणीत कौतुक >> पान 2

घाणेरड्या विषयाचे राजकारण करून चिखलफेक >> पान 3

स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईने स्थानिक प्रशासनाचे वस्त्रहरण >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

सुविचार
ज्ञान हीच खरी संपत्ती आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



SRH ची मालकिण काव्या मारन 'या' प्रसिद्ध गायकाला करतेय डेट?

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 225 ■ शनिवार, दि. 29 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## ३१ मार्चला कोरडा दिवस जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** जिल्ह्यात सोमवार दि. ३१ मार्च २०२५ रोजी किंवा चंद्र दर्शनानुसार एक दिवस पुढे-मागे रमजान ईदचा उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला जाणार आहे. या उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कायम राहावी आणि सार्वजनिक शांततेस बाधा येऊ नये, यासाठी दारूबंदी कायदा १९४९ च्या कलम १४२ अंतर्गत मिळालेल्या अधिकारांचा वापर करून ३१ मार्च कोरडा दिवस म्हणून जाहीर केला आहे, असे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व देशी-विदेशी दारू दुकाने, परवानाकक्ष, तसेच बिअर बार संपूर्ण दिवस बंद राहणार आहेत. सर्व अनुज्ञप्तीधारकांनी हे आदेश पाळावेत. आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## काँग्रेस पक्षाचे माजी शहराध्यक्ष दीपक सलामपूरीया अपघातात ठार



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे माजी शेगाव शहर अध्यक्ष दीपक सलामपुरिया यांचा गाडीच्या धडकेत जागीच मृत्यू झाला. शेगाव शहरातील मुरारका हायस्कूल जवळील वळणावर हा अपघात घडला.



दीपक सलामपुरिया यांची शेगाव शहरातील बाळापुर रोड वर मुरारका हायस्कूल जवळ दुकान दूध डेयरी आहे. आज दुपारच्या सुमारास ते दुकानावरून समोरच्याच खुल्या जागेत लघवीसाठी गेले असता परत येताना रस्ता ओलांडताना अपघात घडला. भरधाव येणाऱ्या टिप्परने त्यांना जोरदार धडक दिली. यामध्ये त्यांचा जागेचा मृत्यू झाला. नागरिकांनी त्यांना लगेच शेगावच्या सईबाई मोटे उपजिल्हा रुग्णालयामध्ये हलवले. मात्र, डॉक्टरांनी तेथे त्यांना मृत घोषित केले. दीपक सलामपुरे यांनी शेगाव शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष पद भूषविलेले आहेत. तर सध्याचे जिल्हा काँग्रेस कमिटी पदाधिकारी होते.

## 3 एप्रिलला महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक

**बुलडाणा /प्रतिनिधी :** महाराष्ट्र वैद्यकीय परिषद मुंबई यांचेकडून प्रत्येक जिल्हास्तरावर महाराष्ट्र वैद्यकीय परिषद निवडणूक २०२५ करिता निवडणूक कार्यक्रम घोषीत केला आहे. त्याअनुषंगाने जिल्हातील निवडणूक दि. ३ एप्रिल २०२५ रोजी लेक्चर हॉल कॉम्प्लेक्स, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा महीला रुग्णालय, टी.वी. हॉस्पीटल परीसर, धाड रोड, बुलढाणा येथे घेण्यात येणार आहे. तरी जिल्हयातील संबंधित मतदारांनी मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

सदर निवडणूक प्रक्रियेमध्ये वैद्यकीय अधिकारी तसेच खासगी डॉक्टर्स हे मतदार असणार आहेत. बुलडाणा जिल्हयात एकूण २३११ मतदार आहेत. प्रत्येक मतदारास एकूण ९ (नऊ) मते देण्याचा अधिकार आहे. तसेच सदर निवडणूकीसाठी जिल्ह्यातील एकूण मतदारांची संख्या लक्षात घेवून एकूण ५ मतदान केंद्र लेक्चर हॉल कॉम्प्लेक्स, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा महीला रुग्णालय, टी.बी. हॉस्पीटल परीसर, धाड रोड, बुलढाणा येथे ठेवण्यात आलेले आहेत. मतदान गुप्त पध्दतीने महाराष्ट्र वैद्यकीय परिषद नियम १९६७ व महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (पहिली सुधारणा) नियम २००२ मधील तरतूदीनुसार होईल, असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

# केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २% वाढ



**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत महागाई भत्ता वाढवण्यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र सरकारनं महागाई भत्ता २ टक्क्यांनी वाढवला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यासंदर्भातील घोषणा पत्रकार परिषद घेत केली आहे. त्यामुळं केंद्रीय कर्मचाऱ्यांना मिळणारा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरुन ५५ टक्क्यांवर पोहोचला आहे.**

## ■ आठव्या वेतन आयोगापूर्वी ५३% वरून ५५% झाला
## ■ ५० लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना फायदा

केंद्र सरकार महागाई भत्ता वाढीसंदर्भात घोषणा केली आहे. याचा फायदा केंद्राचे कर्मचारी अन् पेन्शनर्स मिळून १ कोटी लोकांना फायदा होणार आहे. महागाई भत्ता २ टक्क्यांनी वाढवणं ही गेल्या ७ वर्षातील सर्वात कमी वाढ ठरली आहे.

सरकारकडून दरवर्षी १ जानेवारी आणि १ जुलै रोजी महागाई भत्ता रिवाईज केला जातो. त्यानंतर याची घोषणा केली जाते. अपेक्षेप्रमाणं महागाई भत्ता २ टक्के वाढला आहे. सध्या महागाई भत्ता ५३ टक्के असून वाढून ५५ टक्के झाला आहे.



कर्मचारी संघटनांकडून डीए ३ टक्क्यांनी वाढवण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, केंद्र सरकारनं डीए केवळ २ टक्क्यांनी वाढवला आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये महागाई भत्ता ३ टक्क्यांनी वाढवला होता. त्यामुळं तो ५० टक्क्यांवरुन ५३ टक्क्यांपर्यंत पोहोचला. महागाई भत्ता २ टक्क्यांनी वाढला आहे. आता ज्याचं मूळ वेतन १८००० जार असेल त्यांच्या पगारात ३६० रुपयांची वाढ होईल. ५५ टक्क्यांच्या हिशोबानं महागाई भत्ता ९९०० रुपये मिळेल. जर तीन टक्के वाढ झाली तर ५६ टक्क्यांच्या हिशोबानं महागाई भत्ता १००८० रुपये मिळाला असता.

महागाई भत्ता ग्राहक मूल्य निर्देशांकांच्या आधारावर निश्र्चित केला जातो. २००६ मध्ये सरकारनं महागाई भत्ता मोजण्यासाठी नवं पद्धत सुरु केली होती. याशिवाय केंद्र सरकारचे कर्मचारी आठव्या वेतन आयोगाची प्रतीक्षा देखील करत आहेत. केंद्रानं याबाबत जानेवारी २०२५ मध्ये घोषणा केलेली. तो जानेवारी २०२६ पासून लागू होणं अपेक्षित आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की सरकारनं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सरकारनं केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनर्सच्या महागाई भत्त्यात आणि डीआरमध्ये २ टक्के वाढ केली आहे. ही वाढ १ जानेवारी २०२५ पासून लागू होईल. या निर्णयाचा फायदा केंद्र सरकारच्या सेवेतील ४८.६६ लाख केंद्रीय कर्मचाऱ्यांना आणि ६६.५५ लाख पेन्शनधारकांना होणार आहे. यामुळं केंद्र सरकारवर वार्षिक ६६१४.०४ कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडेल. डीए वाढवण्याचा निर्णय सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार करण्यात आला आहे. दरम्यान, केंद्र सरकारनं महागाई भत्ता वाढवण्याची घोषणा केल्यानंतर देशातील राज्य सरकारं त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी कोणता निर्णय घेतात ते पाहावं लागेल.

## प्रशांत कोरटकरच्या पोलीस कोठडीत 30 मार्चपर्यंत वाढ

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर /प्रतिनिधी :** शिवछत्रपतीं बद्दल आक्षेपार्ह भाष्य करुन इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांना धमकी देणाऱ्या प्रशांत कोरटकरच्या पोलीस कोठडीत वाढ झालीयं.

तीन दिवसाची पोलीस कोठडी संपल्यानंतर आज कोरटकरला पुन्हा कोल्हापूर जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आलं. दोन्ही बाजूच्या जोरदार युक्तिवादानंतर कोर्टाने कोरटकरच्या कोठडीत ३० मार्चपर्यंत वाढ केलीये. दरम्यान सुनावणी पुर्वीचं प्रशांत



कोरटकर विरोधात आंदोलन करणाऱ्याला पोलिसांनी अगदी फरफटत नेत ताब्यात घेतलं. प्रशांत कोरटकरवर शिवप्रेमींचा रोष पहाता आज दिवसभरात पोलिसांनी याची खबरदारी घेतल्याचं पाहायला मिळाले. शिवाय



प्रत्येकाची तपासणी करूनच न्यायालयात सोडलं गेलं. दरम्यान वाढून मिळालेल्या दोन दिवसांच्या कोठडीतून पोलीस आणखी कोणत्या महत्वपूर्ण माहितीपर्यंत पोहोचताहेत याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलं आहे.

## आरोपींना फाशी होईपर्यंत लढा सुरुच राहील - धनंजय देशमुख



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** मी नेहमी माझ्या कुटुंबाच्या सुख आणि शांतीसाठी देवाकडे प्रार्थना करायचो. पण आज पहिल्यांदाच माझ्या डोळ्यातील अश्रूंनी मला भगवंताकडे पाहता आले नाही. काही मागताही आले नाही. माझा सर्वस्व असलेला भाऊ संतोष देशमुख यांची जेव्हा क्रूर हत्या झाली तेव्हा आमचे सुखाचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. कोणाच्या नजरेने आमच्या घराला वाईट दिवस दाखवले आणि कुटुंब उद्ध्वस्त झाले. संतोष देशमुख हत्याप्रकरणी आरोपींना फाशी होईपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचे धनंजय देशमुख यांनी सांगितले. देशमुख कुटुंबीय बार्शी येथील मूळ गावी आले होते. त्यांनी भगवंत चरणी नतमस्तक होत मूळ गावातील आठवणींना उजाळा दिला. या प्रकरणातील मुख्य आरोपी कृष्णा आंधळे अजूनही फरार असतानाही त्याने सहआरोपींशी संपर्क साधल्याचे पुरावे हाती लागले आहेत. हे आरोपी सराईत गुन्हेगार आहेत. पोलिस यंत्रणेतील काही लोकांनी त्यांना अभय दिल्यामुळेच ते मोकाट सुटले आहेत. पोलिसांनी वेळेवर कठोर पावले उचलली असती, तर आज माझा भाऊ माझ्यासोबत असता, अशी भावना धनंजय देशमुख यांनी व्यक्त केली.

## प्रवीण पहुरकर यांच्या 'पेबुळ' आत्मकथनास शंकरराव खरात राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बुलढाणा :** आंबेडकरी विचारवंत लेखक प्रवीण पहुरकर यांच्या पेबु ळ या आत्मकथनाला जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपूर यांचा प्राध्यापक शंकरराव खरात राज्यस्तरीय उत्कृष्ट आत्मकथन पुरस्कार जाहीर झाला आहे. ह्या पुरस्काराचे वितरण दिनांक ३० मार्च २०२५ रोजी नागपूरला होणार आहे पेबुल हे आत्मकथन पुण्याच्या मैत्री पब्लिकेशन ने प्रकाशित केलेले आहे पेबूळ हे विदर्भातील एकमेव आंबेडकरवादी आत्मकथन असून प्राध्यापक शंकरराव खरात यांच्या नावाचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रवीण पहूर कर यांना आपल्या लेखणीचे सार्थक झाल्यासारखे वाटते या आपल्या पुस्तकाची दखल घेऊन पुरस्कार दिल्याबद्दल आंबेडकरवादी साहित्य मंडळाचे परीक्षकांचे व विशेषतः अध्यक्ष डॉक्टर दीपक कुमार खोब्रागडे सर व प्राध्यापक डॉक्टर विलास तायडे सर यांचे आभार मानून त्यांनी आनंद व्यक्त केला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अनेक कवी साहित्यिक मित्रांनी अभिनंदन केले आहे

# आजपासून नमो शेतकरी योजनेचे २ हजार रुपये खात्यात येणार!

## शेतकऱ्यांचा गुढीपाडवा जोरात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : 'नमो शेतकरी महासन्मान निधी योजने'च्या सहाव्या हप्त्यांतर्गत उद्यापासून ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबांना लाभ वितरित केला जाणार आहे. या अंतर्गत २१६९ कोटींची रक्कम शेतकऱ्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रिय बँक खात्यात थेट जमा होणार आहे. यासंदर्भातील माहिती महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. शेतक-यांना निश्र्चित उत्पन्न देण्याकरीता केंद्र शासनाने प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजना माहे फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे.**

या योजनेच्या निकषांनुसार सर्व पात्र शेतकरी कुटुंबास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात प्रती वर्षी रू. ६०००/- त्यांच्या आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात लाभ जमा करण्यात येत आहे.प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी 'नमो शेतकरी महासन्मान निधी ही योजना अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी राज्यात सन २०२३-२४ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये पी. एम. किसान योजनेच्या प्रतिवर्ष, प्रतिशेतकरी ६ हजार रुपयाच्या लाभामध्ये महाराष्ट्र शासन आणखी ६ हजार रुपयांची भर घालत आहे. त्यानुसार राज्यातील शेतकऱ्यांना एकंदरीत १२ हजार रुपये प्रतिवर्षी लाभ अदा करण्यात येत



आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्य हस्ते दि. २६ ऑक्टोबर, २०२३ रोजी शिर्डी येथून नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा पहिला हप्ता अदा करण्यात आलेला आहे.आज अखेर नमो शेतकरी महासन्मान निधी योजने अंतर्गत एकूण ५ हप्ते वितरीत करण्यात आलेले असून राज्यातील ९०.८६ लाख शेतकरी कुटुंबांना रू. ८९६१.३१ कोटीचा लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात थेट जमा करण्यात आलेला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते माहे डिसेंबर, २०२४ ते माहे मार्च, २०२५ या कालावधीतील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा १९ वा हप्ता वितरीत करण्यात आला आहे. या हप्ता वित्तरण सोहळयामध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण ९२.८९ लाख शेतकरी कुटुंबाना रक्कम रू. १९६७.१२ कोटी निधीचा लाभ वितरीत करण्यात आलेला आहे. या व्यतिरीक्त त्यानंतरही केंद्र शासनाने पी.एम. किसान योजनेअंतर्गत एकूण ६५०४७ लाभार्थींना लाभ अदायगीचे नियोजन केले आहे. त्यानुसार राज्यातील ९३.२६ लाख शेतकरी कुटुंबाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा सहाव्या हप्त्याचा सुमारे रक्कम रू.२१६९ कोटी लाभ आधार व डीबीटी संलग्न सक्रीय बँक खात्यात जमा करण्यात येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री कार्यालयाकडून देण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मनःपूर्वक आभार मानत असल्याचं देखील म्हटलं आहे.

## मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली. १९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्यातून निघून गेले. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# ठाणेदारच्या कार्याचे ढाकणीत कौतुक

## युवकांना करतात स्पर्धा परीक्षा बाबत मार्गदर्शन

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड/प्रतिनिधी :** तालुक्यातील ढाकणी येथील पोलीस निरीक्षक कैलास भगत हे गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ ठरले असून युवकांसाठी मार्गदर्शक ठरले आहेत. ठाणेदार भगत हे युवकांना शिक्षण घेण्यासाठी व स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी मार्गदर्शन करून युवकांना गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यांनी डीजे मुक्त सण, उत्सव साजरे करण्याचे आवाहन करताच नागरिकांनी त्याला प्रसिद्ध प्रतिसाद देत सर्व सण, उत्सव डीजे मुक्त साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. उमरखेड तालुक्यातील ढाणकी हे गाव अतिशय संवेदनशील गाव आहे.मात्र, काही महिन्यांपूर्वी ढाणकी गावात सांप्रदायीक वाद निर्माण झाला असतानी गाव शांत करण्यासाठी ठाणेदार मनवर यांनी अतिशय पद्धतशीरपणे प्रकरण हाताळले. त्यानंतर ढाणकी शहराला त्यांच्याच तोडीचे ठाणेदार कैलास भगत लाभले आणि त्यांनी त्यांच्या शैलीत गाव कसे शांत राहून येथील अनेक धर्माचे लोक गुण्या गोविंदा ने राहतील याचाच ध्यास घेत त्यांनी अनेक आणि वेगवेगळ्या धार्मिक लोकांच्या कार्यक्रमात जाऊन लोकांना शांत आणि एकत्र करण्याचे काम केले




आहे.तर, कधी शांतता मिटिंग घेऊन गाव एकत्र आणि शांत राहण्यासाठी आपण काय करू शकतो यावर ते लोकांकडून मत घेत असतात. त्यांच्या या स्वभावाने ढाणकी येथील नागरिक आणि तरुण प्रभावित झाले असून येणाऱ्या सण उत्सव मध्ये डी. जे मुक्त साजरे करण्यासाठी ठाणेदार यांनी आहवान केले असता नागरिकांनी त्यांच्या आहवाना ला प्रतिसाद देत सण उत्सव डी. जे मुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. ठाणेदार कैलास भगत हे रात्रीला गावात गस्त करतांनी रात्री १०च्या नंतर रोडने, कॅनटींग व पान टपरीवर गप्पा मारताना उभे असलेल्या तरुणांना अभ्यास आणि नोकरी विषयक मार्गदर्शन करत असतात. त्यांच्या या दररोजच्या गस्तमुळे अपराधी वृतीचे लोकांनमध्ये दहशत निर्माण झाली असून चोरीच्या घटना आटोक्यात येऊन गुन्हेगारी वर आळा बसला आहे. त्यांच्या या काम करण्याच्या शैलीचे ढाणकीतील नागरिक कौतुक करत आहे.



## गरिबांचा फ्रिज म्हणून ओळख असलेल्या माठाला नागरिकांकडून वाढली मागणी, माठांच्या किमतीत दहा टक्क्यांची वाढ

**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी :** उन्हाळ्याला सुरुवात होताच बाजारात फ्रीजला मोठ्या प्रमाणावर मागणी वाढलेली असते. मात्र सर्वसामान्य नागरिकांना फ्रिज घेणे शक्य नसल्यास गरिबांचा फ्रिज म्हणून ओळख असलेल्या मातीच्या माठांच्या विक्रीत मोठ्या प्रमाणावर वाढ होत असते बाजारात विविध प्रकारचे माठ विक्रीसाठी दाखल झाले असून माठ खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी वाढू लागली आहे.

गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता जाणवत असून, त्यामुळे थंडगार पाणी पिण्याचा मोह सर्वांनाच होतो. त्यामुळे 'गरिबांचा फ्रिज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माठांच्या मागणीत वाढ झाली आहे. यंदा मात्र मातीची वाढती किंमत लक्षात घेता माठांच्या किमतीत दहा टक्के वाढ झाली आहे. वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्र्वभूमीवर बाजारात माठ खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी देखील आता होऊ लागली आहे.

## महिला सरपंच ला जीवे मारण्याची धमकी; एकाच्या विरोधात गुन्हा दाखल, पळसखेड येथील घटना

**रिसोड/प्रतिनिधी :** कागदपत्राची पूर्तता न करताच घरकुल मंजूर का करत नाही असे म्हणत दारू पिऊन शिवीगाळ करत करंट लावून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एकाच्या विरोधात रिसोड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर घटना रिसोड तालुक्यातील पळसखेडा येथे दिनांक २६ मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता घडली असून सरपंच सौ वर्षा सिद्धार्थ पावनमारे यांनी रिसोड पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की गावातीलच प्रदीप उर्फ पप्पू आत्माराम मोरे यांनी माझे घरकुल मंजूर का करून करून देत नाही म्हणून शिवीगाळ केली यावर सरपंचाने त्यास तुझे कागदपत्र पूर्ण नाही असे सांगून सुद्धा प्रदीप उर्फ पप्पू याने दारू पिऊन घरी येऊन त्यावेळी घरी कोणीही नसताना शिवीगाळ केली व घरी असलेल्या कपडे वाळवण्याच्या तारामध्ये करंट सोडून जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी रिसोड पोलीस स्टेशनमध्ये आरोपी प्रदीप उर्फ पप्पू विरोधात कलम २९६ ३५१(२) दोन नुसार गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे

## SRH ची मालकिण काव्या मारन 'या' प्रसिद्ध गायकाला करतेय डेट?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** आयपीएल २०२५ मध्ये मैदानात खेळाडूंइतकीच चर्चेत असते ती म्हणजे सनरायझर्स हैदराबाद (डठक) संघाची मालकिण काव्या मारन. तिच्या सौंदर्यामुळे आणि भावनिक प्रतिक्रिया दाखवणाऱ्या क्षणांनी ती चाहत्यांच्या मनात घर करून बसली आहे. आता काव्याच्या प्रेमप्रकरणाची अफवा चर्चेत आहे आणि सोशल मीडियावर तिचं नाव दाक्षिणात्य सुपरहिट गायक आणि संगीतकार अनिरुद्ध रविचंदर याच्याशी जोडले जात आहे.

काव्या मारन ही सन ग्रुपचे चेअरमन कलानिधी मारन यांची कन्या असून ती SRH संघाची सह-मालक आहे. काव्या दर सामन्याला स्टेडियममध्ये दिसते आणि तिच्या प्रत्येक प्रतिक्रियेचे फोटो-व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होतात. यंदा तिच्या खाजगी आयुष्याबाबतच्या चर्चांनी सोशल मीडिया गाजवलं आहे.

IPL 2025 च्या सामन्यापूर्वी अनिरुद्ध रविचंदरने CSK vs MI सामन्यापूर्वी धमाकेदार परफॉर्मन्स दिला. त्याचवेळी काही रिपोर्ट्समध्ये असं म्हटलं गेलं की अनिरुद्ध आणि काव्या एकमेकांना डेट करत आहेत. या चर्चांनंतर चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

"Why This Kolaveri Di' या गाण्यामुळे प्रसिद्ध झालेल्या अनिरुद्धने काही दिवसांपूर्वी शाहरुख खानच्या 'जवान' सिनेमासाठी तब्बल १० कोटी रुपये मानधन घेतल्याचं रिपोर्ट्समध्ये म्हटलं गेलं आहे. त्यामुळे तो सध्या देशातील सर्वात श्रीमंत आणि महागडे संगीतकारांपैकी एक मानला जातो.

अनिरुद्धच्या टीमकडून मात्र या डेटिंगच्या चर्चांवर स्पष्ट प्रतिक्रिया देण्यात आली आहे. त्यांनी म्हटलं की, काव्या आणि अनिरुद्ध फक्त चांगले मित्र आहेत, त्यापलीकडे काहीही नाही. त्यामुळे हे नातं फक्त मैत्रीपुरतं आहे की अधिक काही, हे सध्या स्पष्ट नाही.

दरम्यान, काव्याच्या चाहत्यांमध्ये तिच्या आयुष्याबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता कायम आहे. तिचं सौंदर्य, स्मार्टनेस आणि मैदानातील अस्तित्व ही नेहमीच चर्चेचा विषय ठरते.



## शेतकऱ्याचे कंबरडं मोडण्याचे काम सरकारच्या माध्यमातून केलं जातंय - रोहिणी खडसे


**जळगाव/प्रतिनिधी :** गेल्या कित्येक वर्षापासून कापूस उत्पादक शेतकरी महाराष्ट्र सरकारकडे आशेने पाहतोय, कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा मोबदला तर दूरच परंतु खर्च सुद्धा निघत नाही, कारण कपाशीला बाजारामध्ये भाव नाही, जे शेतकरी बांधव सरकारकडे आशेने पाहत होते, परंतु सरकारने मोबदलाही दिला नाही भाव घेणे तर दूरच, परंतु कपाशीच्या बी बियाण्यामध्ये भरघोस अशी वाढ केलेली आहे, शेतकऱ्याचं कंबरड मोडण्याचे काम सरकारच्या माध्यमातून चालू आहे अशी घणाघाती टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेश रोहिणी खडसे यांनी सरकारवर केली आहे.

# मुकुंदवाडी परिसरात धारदार शस्त्र घेऊन व्हिडिओ व्हायरल करणारे तरुण अखेर जेरबंद

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरातील मुकुंदवाडी परिसरात हातात धारदार शस्त्रे घेऊन तसेच बंदूक घेऊन व्हिडिओ व्हायरल करत खंडणी वसूल करणारे तीन आरोपी आज छत्रपती संभाजीनगर गुन्हे शाखेच्या पथकाने ठाणे येथे जाऊन अटक केली आहेत. विकी सोनकांबळे उर्फ हेल्मेट, मुकेश साळवे उर्फ मुक्या आणि बालाजी पिवळ अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. यातील विकी हेल्मेट आणि बालाजी पिवळ या दोन्ही आरोपींवर प्रत्येकी ४६ गुन्हे दाखल आहेत. तर मुकेश साळवे याच्यावर १६ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

मुकुंदवाडी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये गणेश व त्यांचा मुलगा व भाचा असे तिघे मिळून मुकुंदवाडी, परिसरातील इच्छामनी हॉटेल जवळील त्यांच्या भंगाराच्या दुकानाच्या जागेत पत्ते खेळत टाईमपास करत असताना त्याठिकाणी विक्की हेल्मेट, मुकेश साळवे, किशोर शिंदे व उमेश गवळी यांनी त्यांच्या इतर साथीदारांसह येऊन भंगाराचे दुकान चालविण्यासाठी २०००/-रूपायाची खंडणी मागितली. त्यावर फिर्यादीने नकार दिल्याने सर्वांनी मिळून फिर्यादीला व त्याच्या नातेवाईकांना मारहाण करून लाकडी दांडके, कोयत्याचा धाक दाखवून १०,०००/- रूपये रोख रक्कम जबरदस्ती घेऊन तिथून पसार झाले होते. तर गणेश यांच्या तक्रारीवरून मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तर या गुन्ह्यातील आरोपींनी गुन्हा केल्यानंतर इन्स्टाग्राम सोशल मिडियावर शस्त्रासह त्यांचे स्वतः चे व्हिडिओ टाकून ते प्रसारीत करून सामान्य नागरिकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. हे आरोपी हे सराईत गुन्हेगार असल्यामुळे त्यांच्याविरूद्ध माहिती देण्यासाठी नागरिक पुढे येत नसत. त्यामुळे गुन्हा केल्यानंतर देखील हे आरोपी फरार राहायचे मात्र या आरोपींचा पोलीस शोध घेत असल्याचे कळताच त्यांनी शहरातून



पळ काढला.

मात्र, पोलिसांच्या धाकाने छत्रपती संभाजीनगर शहर सोडून वेगवेगळ्या ठिकाणी पळून गेले होते. या आरोपींचा शोध घेत असताना गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, गुन्ह्यातील मुख्य आरोपी कुख्यात गुंड विक्की हेल्मेट हा त्यांच्या साथीदारांसह मुंबईला गेला आहे. ह्या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेचे पथक मुंबई येथे रवाना झाले. तेथे जावून आरोपींचा मुंबई येथे मरिन ड्राईव्ह, गेट वे ऑफ इंडिया, अंधेरी, धारावी, दादर, सानपाडा, मुंबई, नवी मुंबई, ठाणे या परिसरामध्ये सलग शोध घेत असताना माहिती मिळाली की, हे सर्व आरोपी हे ठाणे रेल्वेस्टेशन येथे येणार आहेत. त्यावरून पथकासह ठाणे रेल्वेस्टेशन येथे १० तास सापळा लावला लावून सर्व आरोपीना बेड्या ठोकून त्यांना मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# घाणेरड्या विषयाचे राजकारण करून चिखलफेक

## खासदार संजय राऊत यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : दिशा सालियन प्रकरणी आम्हाला राजकारण करायचे नाही. तिच्या वडिलांना हाताशी धरून जे राजकारण करत आहेत. ते त्यांना लखलाभ. आम्ही समर्थ आहोत, आदित्य ठाकरे समर्थ आहेत. घाणेरड्या विषयाचे राजकारण करून जे या महाराष्ट्राच्या पहिल्या क्रमांकाच्या कुटुंबावर चिखलफेक करू इच्छितात आणि पुन्हा बाळासाहेब ठाकरे यांचे फोटो लावू इच्छितात. त्यांना लाजा वाटल्या पाहिजेत, अशी टिका यावेळी खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केली.**

यावेळी ते म्हणाले की, राज ठाकरे बॅनर बाळासाहेब फोटो, बाळासाहेबांचे नाव राष्ट्रपुरुषांच्या यादीत गेले आणि त्यांचा फोटो लावल्यावर कोणी आक्षेप घेऊ शकत नाही. राष्ट्रपुरुष एका व्यक्तीचे एका कुटुंबाचे होऊ होत नाहीत.एकनाथ शिंदे यांचे लोक देखील बाळासाहेबांचा फोटो वापरतात. बाळासाहेब हयात असते तर, त्यांनी मातोश्रीच्या बाहेर या लोकांना चापकाने सोलले असते. शंभुराज देसाई यांची सत्तेची मस्ती आहे. जर कोणी तुम्हाला दुखावणारे व्यक्तव्य केले तर, त्यासाठी कायदा आहे.आमच्यावर देखील आरोप आहेत, आम्ही कोर्टात जातो. कोणी थर्ड डिग्री द्यायचा प्रयत्न करत असेल तर, या राज्यात तालिबानी राज्य आहेत. त्या राज्यांमध्ये गद्दारांना कुठली शिक्षा देतात. हे माहित आहे का? गद्दारांना भर चौकात उघड करून फटके मारले जातात.जर कुणाल कामराला त्या पद्धतीची शिक्षा देत असाल तर गद्दारीचे शिक्षा १०० फटके आणि फासावर लटकवण्याची आहे. ही मान्य आहे का? मान्य असेल तर, सांगा तसा प्रस्ताव आणू, आमच्यावर देखील टीका होत्या, तुम्ही त्याला उत्तर देऊ शकता. पूर्वाश्रमी आमच्याकडून देखील अशा चुका झालेल्या आहेत. पण आपण अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा नियम पाहायला पाहिजे. शिंदे गट कुठलीही मागणी करू शकतात. ते रेड्याचे दूध काढू शकतात, बैलाचे दूध काढू शकतात. या देशात आम्ही काही प्रमाणात स्वातंत्र्य टिकवून ठेवलेले आहे.

तुमच्यावर काही टिपणी केली म्हणून एखाद्याचा चॅनल बंद करायचा. उद्या जर सरकार बदलले आणि तुमच्या विरोधातील कार्यकर्ते यांनी हीच भूमिका घेतली तर, कसं काय व्हायचं?असा प्रश्न राऊतांनी केला. शिंदेंच्या कार्यकर्त्यांना त्यांचा देश अमित शाह यांच्या पलीकडे दिसत नाही. जोपर्यंत अमित शाहा यांचे छत्र त्यांच्या डोक्यावर आहे, तोपर्यंत त्यांची भाषा चालेल. रामकृष्ण आले गेले तसे मोदी, शाह येतील आणि जातील हा इशारा मी त्यांना देतो. उदय सामंत हेच डाऊटफुल आहेत. उदय सामंत हे शिंदेंचे सुद्धा आहेत, फडणवीसांचे देखील आहेत, कधी काळी ते ठाकरे आणि शरद पवारांचे आहेत, अशी वक्तव्य व्यापारी पद्धतीचे मंत्री करत असतात. त्यांना ती अशी वक्तव्य करावी लागतात, चांगली गोष्ट आहे. शरद पवार यांच्या पक्षाची काल राष्ट्रीय कार्यकारणी बैठक होती. माझी त्यांच्याशी चर्चा झाली आहे. शरद पवार हे लढवय्या नेते आहेत, मार्गदर्शक आहेत. हा पराभव कसा घडवून आणला? हे अख्या जगाला ज्ञात आहे. त्यामुळे आम्ही सगळेच एकाच पराभवाने अजिबात खचून जाणारे नाही. आम्हाला माहित आहे कशाप्रकारे निवडणूक लढविण्यात आली, अशा प्रकारे घोटाळे झाले.



पुढल्या लढ्यासाठी आमची तयारी सुरू आहे. ठाकरे ब्रँड संपुष्टात आणण्याचा हा प्रयत्न सुरू आहे. एकनाथ शिंदे, अजित पवार, देवेंद्र फडणवीस हे सत्तेवर आहेत. म्हणून पॉवरफुल आहेत. शरद पवार हे लोकनेते आहेत. कुणाला पॉवरफुल करायचे आणि कुणाला नाही करायचे हे पद्मश्रीच्या यादी सारखे असते. त्यामुळे त्याला गांभीर्याने घेऊ नका, आम्हाला माहित आहे यादी कोणी आणि कशी केली आहे. अशी टिका खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत केली.

## संक्षिप्त...

### महाराजांना कमी लेखायचे काम ही लोक करत आहेत; विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराजांना कमी लेखायचे काम ही लोक करत आहेत.



महाराजांनी हिंदवी स्वराज्य म्हणाले आहे. भिडे म्हणत हिंदूचे होते. मग त्यांच्या विरोधात हिंदू वकील का होते?असा प्रश्न त्यांनी केला.छत्रपती शिवाजी महाराजांना छोट करण्याची स्पर्धा रंगली आहे.या सत्तेतील काही लोक जबाबदार आहेत. असा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी ते पुढे म्हणाले की, वाघ्या प्रकरण ह्या सगळ्या गोष्टी जुन्या आहेत. यावर बोलणे याला अर्थ नाही. पुरावे अभ्यासक यांची समिती असावी, संविधान बदलायचे अधिकारी नाहीत. संविधानाच्या कलम मध्ये कालानारूप बदल होत असतात. तेव्हा घटना दुरुस्ती झाली. या लोकांनी मात्र वाट लावली आहे. उदय सामंत यांच्या खात्यात मुख्यमंत्री हस्तक्षेप करत आहेत.दिवाळीला लोकांना काही दिले ? मुस्लिम समाजाच्या भावना समजून न घेता वक्तव करताना लाज वाटली पाहिजे, अजित पवारांचा पक्ष आहे, त्यांनी निर्णय घ्यावा. देशमुख खून प्रकरण यांची हत्या त्यांनी केली सत्य आहे. मात्र, कराड, मुंढे यांच्यावरून झाली हे समोर आले पाहिजे. शंभूराज देसाई कुणाल कामराला थर्ड डिग्री लावायची म्हणतात. मग या मंत्र्यांना देखील लावली पाहजे, असे मतही यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी व्यक्त केले.

### जे पाकिस्तानचे झेंडे नाचावतात त्यांच्या विरोधात आम्ही आहोत; उद्योग मंत्री उदय सामंत यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** दिशा सालियन प्रकरणी आमची भूमिका स्पष्ट आहे. तिच्या वडिलांनी



याचिका दाखल केली आहे. कोर्ट निकाल देईल, न्याय मिळेल,अशी अपेक्षा आहे. बाळासाहेब म्हणायचे राज्यावर, देशावर प्रेम करणारे मुस्लिम भारतीय आहेत. त्यांना आम्ही माणतोच, जे पाकिस्तानचे झेंडे नाचावतात त्यांच्या विरोधात आम्ही आहोत.अशी प्रतिक्रिया उद्योग मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी सामंत म्हणाले की, भरतशेठ गोगावले आमचे नेते आहेत. ते स्वतःच चांगले सांगू शकतील. एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात आम्ही काम करतो आणि अमित शाह, नरेंद्र मोदींनी निधी दिलाय. आम्ही महायुतीचे नेते आहोत, त्यांचा आदर करतो. वाघ्या कुत्र्याबाबत इतिहासकार यांचे मत जाणून घ्यायला हवे, मुख्यमंत्री ते करतील. महत्व जाणून घेऊ, कुणाल कामरा काय बोलावे याचा विचार त्यानेही करायला हवा ना. त्याची प्रवृत्ती बघा देशाच्या अर्थमंत्र्यांवर टीका करतात. सुप्रीम कोर्ट न्यायाधीशांवर टीका करतात. तो विकृत आहे,म्हणून शंभूराज देसाई यांनी ती प्रतिक्रिया दिली आहे. संजय राऊत यांना मी आवडायला लागलो असावा. मागे त्यांनी माझे कौतुक केले आहे. त्यांना माझ्या शुभेच्छा आहेत. ही सगळी राजकीय अपरिपक्वता आहे.यातून एकनाथ शिंदे आणि माझ्यात तेढ निर्माण होणार नाही.असे मतही उद्योग मंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केले.

### ठाकरे ब्रँड संपलेला आहे संजय शिरसाट यांची ठाकरेंवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** ठाकरे ब्रँड संपलेला आहे. बाळासाहेबांचे शिवसेना आणि विचार जिवंत आहेत.



शिवसेनाप्रमुखांचे विचार आणि पुढे घेऊन जात आहोत.ठाकरे कट केव्हाच संपलेला आहे आणि आम्ही आमच्या पद्धतीने काम करत आहोत. अशी टिका मंत्री संजय सिरसाट यांनी माध्यमांशी बोलताना ठाकरेंवर केली. यावेळी ते पुढे म्हणाले की, आज विमानतळात तथागत गौतम बुद्धांच्या पुतळ्याचे अनावरण पार पडले. विशेष म्हणजे हा सर्व खर्च औद्योगिक संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी केला आहे. युद्ध नको आम्हाला बुद्ध हवा, अशा वातावरणात इथून माणूस बाहेर पडेले. सत्तेत त्यांच्यासोबत युती असते त्यांच्या सोबत राहावे लागते. तुमच्या सारखे नाही. ज्यांच्या सोबत राहायचे नाही त्यांच्यासोबत राहावे लागत आहे. तुम्हाला निकाह आवडत असेल तर, तुम्ही तिकडे संसार करा, आमचा संसार चांगला चालू आहे. विरोधक हे पिसाळलेले कुत्रे आहेत.नेहमी भुकत असतात. आम्ही जमले तर त्यांचेही दूध काढू, फक्त वेळ येऊ द्या, असा इशाराही संजय सिरसाट यांनी दिला. नागपूर दंगल सुनियोजित होती. पेट्रोल-बॉम्ब असेल, दगड असेल, हत्यार असेल ही सर्व एका तासांमध्ये तिथे जमा झाली होती.असे मत यावेळी मंत्री संजय सिरसाट यांनी व्यक्त केले.

## विद्यापीठाने राबविलेला आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्याचा उपक्रम स्तुत्य, मंत्री अशोक उईके यांच्याहस्ते चर्चासत्राचे उद्घाटन



दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आदिवासी वारसा ओळख आणि अस्तित्वाचा उत्सव या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्याहस्ते चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले. या चर्चासत्रात आदिवासी संस्कृती लोककला आदिवासी बोलीभाषा या विविध विषयांवर दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. यावेळी मंत्री अशोक उईके यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिरसा मुंडा व आदिवासी बांधवांचे खऱ्या अर्थाने कार्य उजेडात आणण्याचे काम केले. आज विद्यापीठाने आयोजित केलेल्या चर्चासत्राच्या माध्यमातून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम करत असल्याने त्यांच्या कार्यासाठी आपण शुभेच्छा देत असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागातर्फे गेल्या वर्षांपासून सावित्रीबाई फुले प्रथम शिक्षित विद्यार्थीनी सन्मान योजना सुरू करण्यात आली असून या योजनेच्या माध्यमातून आदिवासी भागातील अशिक्षीत किंवा अल्पशिक्षित आई, वडीलांच्या कुटुंबितील प्रथमच शिक्षण घेणाऱ्या ९ विद्यार्थीनींचा मंत्री उईके यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला.

## सीएचा मोबाईल हिसकावणारा काही तासातच जेरबंद; चाळीसगाव रोड पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी

दैनिक आपला विदर्भ



**धुळे/प्रतिनिधी :** चाळीसगाव रोडवरील डीपी मार्गावर पायी जात असणाऱ्या महिला चार्टर्ड अकाऊंटंटचा मोबाईल बळजबरीने हिसकावून चोरट्याने पळ काढल्याची घटना गुरुवारी सायंकाळी घडली होती. गुन्हा दाखल होताच चाळीसगाव रोड पोलिसांनी तपासाची चक्रे फिरविली आणि काही तासात चोरट्याच्या मुसक्या आवळल्या.

चाळीसगाव रोडवरील विठ्ठल नगर प्लाट नंबर १९ येथे राहणाऱ्या रेखा प्रल्हादराव पाटील या चार्टर्ड अकाऊंटंट आहेत, त्या याच भागातील डीपी रोडवरील मुसा चाबी दुकानाच्या समोरच्या भागातून पायी चाललेल्या होत्या, वर्दळीचे हे ठिकाण असताना संधी साधून एका चोरट्याने बळजबरीने महिलेच्या हातातून मोबाईल हिसकाविला. महिलेने आरडाओरड केली. पण, तो पर्यंत चोरटा पसार होण्यास यशस्वी ठरला. त्याच भागात चोरट्याचा शोध घेण्यात आला. पण मोबाईल हिसकाविणारा चोरटा काही सापडला नाही. लंपास झालेला मोबाईल हा ६५ हजार रुपये किंमतीचा आहे. त्याच मोबाईलच्या कव्हरमध्ये महिलेचे आधारकार्डही होते.

याप्रकरणानंतर रेखा पाटील यांनी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात धाव घेवून फिर्याद दाखल केली. सहायक पोलीस निरीक्षक जीवन बोरसे यांनी तपासाची चक्रे फिरविली आणि गोपनीय माहिती तसेच महिलेने केलेले चोरट्याच्या वर्णन याचा आधार घेतला. संशयिताचा शोध घेण्यासाठी पथकाला रवाना करण्यात आले. मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर शहरानजिक असलेल्या बीएसएनएन कंपनीच्या टॉवरजवळ एक तरुण संशयितरित्या फिरताना आढळून आला, पोलिसांना पाहताच तरुणाने धूम ठोकली. महिलेने सांगितलेल्या वर्णनानुसार तरुण असल्याचे लक्षात येताच तरुणाचा पोलिसांनी पाठलाग करत त्याच्या मुसक्या आवळल्या, त्याला पोलिसी खाक्या दाखविताच त्याने मोबाईल चोरल्याची कबुली पोलिसांना दिली. पकडलेल्या चोरट्याचे नाव मोहम्मद मुस्तफा शब्बीर अहमद असून त्याच्याकडून ६५ हजाराचा मोबाईल जप्त करण्यात आला. या घटनेमुळे अवघ्या काही तासापूर्वी घडलेल्या घटनेची उकल करण्यात चाळीसगाव रोड पोलिसांना यश आले आहे.

## पतीने केली पत्नीची निर्घृण हत्या! सांगलीत धक्कादायक घटना

दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** मांगले येथे पतीने दारूच्या नशेत ओढणीच्या साहय्याने पत्नीचा गळा आवळून मृतदेह विद्युत पंपाच्या पेटीत घालून ठेवल्याची घटना आज सकाळी दहाच्या सुमारास घडली. खून करून पतीची स्वारी थेट शिराळा पोलिसांत हजर.

याबाबत अधिक माहिती अशी आरोपी मंगेशचा भाऊ निलेश आणि त्याची आई गेल्या पंधरा वर्षापासून मांगले येथे वास्तव्यास आहे. मांगले वारणानगर रस्त्यावर जोतिबा मंदिराच्या समोर रामचंद्र वाघ यांच्या कौलारू घरात ते भाड्याने राहत आहेत. गेल्या चार दिवसांपूर्वी मंगेश त्याची पत्नी प्राजक्ता व सहा वर्षाचा मुलगा शिवम तीन वर्षाची मुलगी शिवन्या मुंबईहून आई आणि भावाकडे रहायला आले होते. गेल्या चार दिवसांपासून एकत्र राहणारे मंगेश आणि प्राजक्ता आज सकाळी भाऊ निलेश आणि आई देववाडी येथे एका दुखाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. सकाळी दहाच्या दरम्यान निलेश व प्राजक्तामध्ये वाद झाला. वाद विकोपाला जाऊन मंगेशने प्राजक्ताचा ओढणीने गळा आवळून खून करून मृतदेह बाजूच्याच बाजूच्या खोलीत घर मालकाने ठेवलेल्या विद्युत पंपाच्या पेटीत हातपाय मोडून मृतदेह घालून पेटीत झाकून ठेवला व खोलीला बाहेरून कुलूप घालून, भाऊ निलेश यांला फोन करून मी शिराळ्याला जाणार आहे. गाडी घेऊन ये असा निरोप दिला. त्यानंतर भाऊ निलेश देववाडीतून मांगले गावात आल्यानंतर मंगेशने भावाकडून गाडी घेऊन तो शिराळ्याकडे निघून गेला. ह्याच दरम्यान मंगेशचा सहा वर्षाचा मुलगा शिवम दारातच रडत होता. त्यावेळी निलेशने त्याला समजावून काय झाले विचारले त्यावेळी सहा वर्षाच्या शिवमने मम्मी, पप्पांचे दोघांचे भांडण होऊन पप्पांनी आईला मारून खोलीत ठेवल्याचे सांगितले. त्यानंतर निलेशने मंगेशला फोन करून कुठे आहेस असे विचारले. त्यावेळी त्याने मी शिराळा येथील गोरक्षनाथ मंदिरा जवळ असल्याचे सांगितले. त्यानंतर निलेशने देववाडी येथील येथील बहिणीला आणि तिच्या पतीला बोलवून घेतले. मंगेशला फोन करून गोरक्षनाथ मंदिराजवळच थांब आम्ही येतो म्हणून सांगितले. त्यानंतर गोरक्षनाथ मंदिराजवळ जावून सविस्तर माहिती विचारल्यानंतर त्याने खून केल्याचे सांगितले .त्यानंतर या तिघांनीही त्याला आम्हाला त्रास होईल तू पोलीस स्टेशनला जाऊन माहिती दे असे सांगितले. त्यानंतर



तो स्वतः शिराळा पोलिसात हजर झाला. दरम्यान दुपारनंतर घटनेची माहिती मिळाल्यावर ज्योतिबा मंदिरा शेजारी वाघ यांच्या घरासमोर लोकांनी बघण्यासाठी गर्दी केली. होती शिराळा पोलिसांनी मयत प्राजक्ताच्या आईला व इतर नातेवाईकांना घटनेची माहिती दिली .पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शिराळा येथील उपजिल्हा रुग्णालयात न्हेण्यात आला आई रजनी जाधव यांनी शिराळा पोलिस ठाण्यात फिर्यादिदिली..अधिक तपास शिराळा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धेश्वर जंगम करीत आहेत.

## विविध वृत्त...

### १० वर्षीय चिमुकलीवर २२ वर्षीय तरुणाने केला लैंगिक अत्याचार, आरोपीला पोलिसांनी केली अटक



दैनिक आपला विदर्भ



**गोंदिया/प्रतिनिधी :** चौथ्या वर्गात शिकणाऱ्या १० वर्षीय चिमुकलीवर २२ वर्षांच्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना गोंदिया जिल्ह्यातील मोरगाव अर्जुनी तालुक्यात घडली आहे. या प्रकरणातील आरोपीला केशोरी पोलिसांनी अटक केली आहे. कमलेश मडावी (२२) असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. या घटनेमुळे गोंदिया जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. आरोपी आणि पीडिता चिमुकली ही एकाच गावातील रहिवासी असून शाळेला सुट्टी झाल्यानंतर चिमुकली ही घराच्या अंगणात खेळत होती. आरोपी तिच्या घरी गेला व पिण्यासाठी पाणी मागितले व त्यानंतर चिमुकलीवर अत्याचार केले ही बाब शेजाऱ्यांना लक्षात येताच शेजाऱ्यांनी पिढीतेच्या कुटुंबीयांना याची माहिती दिली. त्यानंतर कुटुंबीयांनी पोलीस स्टेशन गाठत या घटनेची माहिती पोलिसांना दिली. याप्रकरणी पोलिसांनी कलम ६५/२, पॉस्को ४/६/८ व ३३२ अशा विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून आरोपीला अटक केली आहे. घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे यांच्या मार्गदर्शनाखाली केशोरीचे पोलीस निरीक्षक गणेश वनारे करीत आहेत.

### अकोल्यात शिंदे गटाकडून पिण्याच्या पाण्यासाठी जोरदार आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अकोला/प्रतिनिधी :** अकोल्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने पिण्याच्या पाण्यासाठी जोरदार आंदोलन केले. अकोला शहराला मागील काही महिन्यांपासून दूषित पाणीपुरवठा होत असल्याने अनेकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तर इतकेच नाही तर अकोला महापालिकेने अकोलेकरांना अवाजवी पाणी बिल पाठवल्याचा आरोप शिवसेनेने यादरम्यान केला आहे. तर याच पाणी बिलाची शिवसेनेने होळी केली आहे. तसेच सुधारित बिल आल्याशिवाय अकोलेकरांनी पाणी बिल भरु नये, असे आवाहनही शिवसेनेने केले आहे.

तर आज शिवसेनेचे पदाधिकारी चांगलेच आक्रमक झाले होते. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात हे आंदोलन होतं. अकोलेकरांना होत असलेल्या दूषित पाणी पुरवठा विरोधात शिवसेनेना आक्रमक होत चक्क पाणीपुरवठा अधिकाऱ्याला दूषित पाणी प्यायला देण्याचा प्रयत्न केलाय. तसेच पाणी बिल अधिकाऱ्यांच्या टेबलावर फेकून दिले. अख्खा कार्यालय शिवसेनेच्या पदाधिकांनी गजबजल होतं. तर काही शिवसेनेचे कार्यकर्त्यांनी थेट महापालिका कार्यालयातील खुर्चीवर चढत घोषणाबाजी दिल्या आहेत.

### पाणी टंचाई निवारणार्थ चिखली तालुक्यातील दोन गावांसाठी टँकर मंजूर

**बुलडाणा /प्रतिनिधी :** पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता चिखली तालुक्यातील दोन गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये भालगाव व कोलारा या ठिकाणी ठरवून दिल्याप्रमाणे टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती चिखली उपविभागीय अधिकारी यांनी दिली.

भालगाव येथे १ हजार ६२० पशुधन व ३ हजार २७३ लोकसंख्येसाठी एक टँकर ९६ हजार ६०० लिटर्स पाणी पुरवठा करणार आहेत. कोलारा गावाला ४ हजार पशुधन व ४ हजार ८५६ लोकसंख्येसाठी एक टँकर १ लक्ष ७६ हजार ६६० लिटर्स पाणी दररोज टँकरव्दारे पुरवठा करेल. पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता या पाच गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईने स्थानिक प्रशासनाचे वस्त्रहरण

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई लाखो रुपयांचा गुटखा जप्त

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव /का. प्रतिनिधी : डोणगाव पोलीस स्टेशन हद्दीत सर्वत्र खुलेआम अवैध धंदे सुरू आहेत. गुटखा विक्री ही अनेकांची वरकमाईचे साधन झाले आहे. त्यामुळे डोणगाव व डोणगाव परिसरात दर दिवशी लाखो रुपयांचा गुटखा विक्री केल्या जातो. याबाबत डोणगाव पोलिसांना कल्पना नसावी हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तर, बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने डोणगाव येथे येऊन कारवाई करत तब्बल २१ लाख रुपयांच्या वर मुद्देमाल जप्त केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवाईने स्थानिक प्रशासनाचे वस्त्रहरण झाल्याची चर्चा संपूर्ण परिसरात सुरू आहे.**




२७ मार्च रोजी डोणगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत, पोलिस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेने गुप्त माहितीच्या आधारे कारवाई केली. यामध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा आणि सुगंधी तंबाखू गुटख्यासह आरोपी अटक करण्यात आलेल्या आहे. एकूण २१ लाख २० हजार ८३२ रुपयांचा मुद्देमाल, ज्यात गुटखा, तंबाखू आणि मालवाहू वाहन यांचा समावेश आहे. मात्र लाखो रुपयांचा गुटखा डोणगाव येथे येतो आणि डोणगाव येथून परिसरात वितरित होतो तरीही डोणगाव पोलिसांना याची कल्पना नाही, याबाबत मात्र आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. लाखो रुपयांचा गुटखा डोणगाव येथे कोण आणतो, त्याचा मुखिया कोण? कोणाच्या आशीर्वादाने हे अवैध धंदे सुरू आहेत ?असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. पोलिसांनी २१ लाख रुपयाचा गुटखा जप्त केला असला तरी हा गुटखा डोणगाव येथे कोणी खरेदी केला ? किंवा डोणगाव येथून अवैध गुटखा विक्रीचा व्यवसाय कोण करतो ? याबाबत पोलिसांना माहित नाही का नाही ?हा गुटखा डोणगाव येथून येथे कोठून येतो ? कोणा मार्फत तो विकल्या जातो.गुटखा साठवण्याचे गोडाऊन कुठे आहे.? दर दिवसाला दुधाप्रमाणे वाटप होत असलेल्या या अवैध गुटखाबाबत पोलिसांना कशी माहिती नाही, असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहेत. तर, बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने डोणगाव येथे येऊन कारवाई करीत तब्बल वीस लाखांवर मुद्देमाल जप्त केल्यानंतरही डोणगाव पोलिसांना याचा थांगपत्ता नसावा, याबाबत मात्र आश्र्चर्य व्यक्त केल्या जात आहे.तर, बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कारवाई स्थानिक प्रशासनाचे मात्र वस्त्रहरण केले अशी प्रतिक्रिया आता डोणगाव परिसरात होत आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ज्याप्रमाणे अवैध गुटखा विक्रीवर कारवाई करून लाखोंच्या गुटखा जप्त केला.त्याचप्रमाणे इतर अवैध धंद्यांवरही कारवाई करून अवैध धंदे करीत लाखोंची उलाढाल करणाऱ्यांच्या मुस्क्या आवळाव्यात, अशी मागणी डोणगाव परिसरातील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

### आमदार सिद्धार्थ खरात यांनी केला होता विधानसभेत प्रश्न उपस्थित

मेहकर –लोणार मतदार संघात खुलेआम अवैधंदे सुरू आहे. वरली, जुगार, चक्री, दारू विक्री आदी धंदे खुलेआम सुरू असून हे कोणाचे आशीर्वादाने सुरू आहेत.गोरगरिबांचे कुटुंब उध्वस्त करणारे हे अवैध धंदे तात्काळ बंद करावे, याबाबत एसपी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी करत विधानसभेमध्ये मेहकर –लोणार मतदारसंघातील अवैध धंद्याचा प्रश्र्न उपस्थित केला होता. त्यानंतर अवघ्या चार दिवसातच डोणगाव येथे अवैध गुटखा विक्री करणाऱ्यावर कारवाई करीत तब्बल लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याने अवैधंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.तर, हप्ताखोर अधिकाऱ्यांचेही पितळ आता उघडे पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### अन्न व औषधी प्रशासन नावालाच

डोणगाव येथे खुलेआम अवैध गुटखा विक्री होत आहे. तर, तब्बल दीडशे किलोमीटर अंतरावर येत बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने पथक डोणगाव येथे परिसरात कारवाई करून लाखोंचा मुद्देमाल जप्त केला आहे. मात्र, डोणगाव परिसरातील अवैध गुटखा विक्री बाबत अन्न व औषधी प्रशासन विभागाला माहिती कशी नाही? असा प्रश्र्न उपस्थित होत आहे. अन्न व औषधी प्रशासन विभागाने डोणगाव परिसरात अद्याप एकही कारवाई का? केलेली नाही, अथवा अवैध गुटखा विक्री करणाऱ्या बाबत कोणतेही ठोस पावले का?उचलले नाहीत. यावरून अन्न व औषधी प्रशासन विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्र्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.एकीकडे शासन व्यसन मुक्त पिढी घडविण्यासाठी जनजागृती करीत आहे. तर, दुसरीकडे प्रशासनातील भ्रष्ट वृत्तीच्या लोकांमुळे गोरगरिबांचे कुटुंब रस्त्यावर येत आहेत. याकडे वरिष्ठांनी गांभीर्याने लक्ष देत अवैध गुटखा विक्री असो व इतर अवैध धंदे करणाऱ्यांच्या मुसक्या आवळून अवैध धंदे कायमस्वरूपी बंद करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## काँग्रेसच्या व्हीजेएनटी सेलच्या प्रदेश उपाध्यक्षांनी आमदार संजय गायकवाड यांच्या नेतृत्वात केला शिवसेनेत प्रवेश

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा /प्रतिनिधी :** बुलढाण्यात उ.बा.ठा आणि काँग्रेसला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गटातून शिवसेना शिंदे गटात होणाऱ्या प्रवेशांनी काँग्रेसची चिंता वाढवली आहे. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती झाल्यापासून आणि उ.बा.ठा मधील अनेकजण शिंदे गटात प्रवेश करू लागले असून, काँग्रेसला लागलेली गळती थांबत नसल्याचे दिसून येत आहे. ह्या दरम्यान, आमदार संजय गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेसच्या व्हीजेएनटी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष साहेबराव चव्हाण यांच्या सह काँग्रेस आणि उ.बा.ठा चे जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह शिवसेनेत प्रवेश केला आहे. यावेळी शिवसेनेचे नगरसेवक, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, विभागप्रमुख, उपविभाग प्रमुख, शिवसैनिक, महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी; पीक विमा नुकसान भरपाईचे पैसे होणार शेतकऱ्यांच्या खात्यात जमा

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा /प्रतिनिधी :** शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी ...भारतीय कृषी विमा कंपनीला अदा करावयाची दायित्व रक्कम वितरित करण्यात आल्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेची नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे अशी माहिती केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन देण्यात आली आहे.

सर्वसमावेशक पिक विमा योजनेअंतर्गत खरीप रब्बीच्या ८०:११० मॉडेल नुसार शेतकऱ्यांना प्रिमियमनुसार ११०% नुकसान भरपाई देणे गरजे होते त्या दृष्टिकोनातून केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत चर्चा करून यासंदर्भात पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक बोलविण्यात आली होती. या बैठकीमध्ये ते दृकश्राव्य पद्धतीने सहभागी झाले होते या बैठकीत विमा कंपनीच्या सोबतही चर्चा करण्यात आली होती व ११०% नुकसान भरपाई च्या अनुषंगाने राज्यातील शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईपोटी अनुक्रमे १८१,०६,९९,२७९ व ६३,१४,६७,७८० रुपये असे एकूण २,४४,२१,६७,०५९ रुपयांची रक्कम पीक विमा कंपनीला अदा करण्यात आली आहे या संदर्भातील शासन निर्णयही निर्गमित झाला आहे त्यामुळे आता शेतकऱ्यांच्या खात्यात पीक विम्याचे पैसे जमा होणार आहेत.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अंतर्गत रब्बी हंगाम सन २०२३–२४ अंतर्गत एकुण रु.४५३.७६ कोटी इतकी नुकसान भरपाई मंजुर झाली असून त्यापैकी अद्यापपर्यंत पीक विमा कंपनीने (एकुण प्रिमियम रकमेच्या ११० टक्के) रु. २६३.५१ कोटी इतकी नुकसान भरपाईची रक्कम वाटप केली आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी प्रलंबित नुकसान भरपाई वाटपाकरिता खरीप हंगाम सन २०२३–२४ साठी रु.११४.५५ कोटी आणि रब्बी हंगाम सन २०२३–२४ साठी रु. ७५.७० कोटी असे एकुण रु.१९०.२५ कोटी इतक्या रकमेकरिता शासनाने मान्यता दिली आहे. भारतीय कृषी विमा कंपनीस निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. विमा कंपनीमार्फत प्रलंबित नुकसान भरपाईची रक्कम वितरीत करणेबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. काही दिवसात नुकसान भरपाईची रक्कम संबंधित पात्र विमाधारक शेतकऱ्यांचे बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. या संदर्भातील माहिती केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयातुन देण्यात आली आहे

### बुलढाणा जिल्ह्यातील मंजुर व प्रलंबित नुकसान भरपाई तपशील (सुधारीत)

| | | |
|---|---|---|
| | **खरीप हंगाम सन २०२३–२४** | |
| मंजूर नुकसान भरपाई | | : रु. २५३.०९ कोटी (२९२३८९ शेतकरी) |
| नुकसान भरपाई वाटप | | : रु. १३८.५४ कोटी (२१०२८९ शेतकरी) |
| प्रलंबित नुकसान भरपाई | | : रु. ११४.५५ कोटी (८२१०० शेतकरी) |
| | **रब्बी हंगाम सन २०२३–२४** | |
| मंजूर नुकसान भरपाई | | : रु. २००.६७ कोटी (१५८३८४ शेतकरी) |
| नुकसान भरपाई वाटप | | : रु. १२४.९७ कोटी (५६८२६ शेतकरी) |
| प्रलंबित नुकसान भरपाई | | : रु. ७५.७० कोटी (१०१५५८ शेतकरी) |
| | **एकूण** | |
| मंजूर नुकसान भरपाई | | : रु. ४५३.७६ कोटी (४५०७७३ शेतकरी) |
| नुकसान भरपाई वाटप | | : रु. २६३.५१ कोटी (२६७११५ शेतकरी) |
| प्रलंबित नुकसान भरपाई | | : रु. १९०.२५ कोटी (१८३६५८ शेतकरी) |

